# 10 ऑक्टोबर 2021 चालू घडामोडी PDF Download



## चालू घडामोडी (10 ऑक्टोबर 2021)

जगातील शंभर अब्ज डॉलर संपत्तीधारकांत मुकेश अंबानी :

- आशियातील सर्वात श्रीमंत व्यक्ती असलेले उद्योगपती मुकेश अंबानी यांचा 100 अब्ज डॉलर संपत्तीचे मालक असलेल्या गटात समावेश झाला आहे.
- तर त्यामुळे ते आता **जेफ बेझॉस, इलन मस्क** यांच्या यादीत जाऊन बसले आहेत.

- मुकेश अंबानी हे रिलायन्स इंडस्ट्रीज लि.चे अध्यक्ष असून ते आता मोजक्या 11 उद्योगपतींच्या गटात आले आहेत ज्यांची संपत्ती शंभर अब्ज डॉलर आहे.
- तेल शुद्धीकरण व पेट्रोकेमिकल उद्योगात त्यांच्या वडिलांचा वारसा त्यांना मिळाला. त्यातून नंतर ते किरकोळ विक्री क्षेत्र, तंत्रज्ञान, इ व्यापार यातही उतरले.
- तसेच त्यांनी **2016** मध्ये दूरसंदेशवहन सेवा सुरू केली असून आता भारतात ती जोमाने सुरू आहे. त्यांनी गेल्या वर्षी किरकोळ विक्री क्षेत्र व तंत्रज्ञान या क्षेत्रात 27 अब्ज डॉलरची उलाढाल केली होती.
- फेसबुक, गुगल, केकेआर व सिल्वर लेक कंपन्यांना त्यांनी काही समभाग विकले होते.
- जूनमध्ये त्यांनी ऊर्जा क्षेत्रात **10 अब्ज डॉलरची गुंतवणूक तीन वर्षात करण्याचे जाहीर** केले आहे. स्वस्तात हरित हायड्रोजनची निर्मिती करण्याचा इरादाही त्यांनी व्यक्त केला होता.

## Must Read (नक्की वाचा):

चालू घडामोडी (9 ऑक्टोबर 2021)

### भारत-चीनमध्ये आज लष्करी चर्चा :

- भारत आणि चीन यांच्यात आज पूर्व लडाखमधील सैन्यमाघारीच्या मुद्द्यावर लष्करी पातळीवर चर्चेची तेरावी फेरी होणार आहे.
- तर सकाळी साडेदहा वाजता पूर्व **लडाखमध्ये चीनच्या बाजूला असलेल्या मोल्दो** येथे ही चर्चा होईल.

सैन्यमाघारीची प्रक्रिया वेगाने व्हावी, अशी भारताची अपेक्षा असून देपसांग

आणि डेमचोक येथून चीनने सैन्य माघारी घ्यावे यासाठी आग्रह धरण्यात येत आहे.

- तसेच **31 जुलै** रोजी चर्चेच्या बाराव्या फेरीत गोगरा येथून सैन्यमाघारीच्या मुद्द्यावर यश आले होते.

भारताच्या वेगवान गोलंदाज उमरान मलिकची टी 20 वर्ल्डकप संघात निवड :

- **आयपीएल 2021** स्पर्धेत आपल्या वेगवान गोलंदाजीने सर्वांचं लक्ष वेधून घेणाऱ्या जम्मू-काश्मीरच्या गोलंदाजाची भारतीय संघात निवड झाली आहे.
- तर टी 20 वर्ल्डकप संघात उमरान मलिकची निवड करण्यात आली आहे.
- उमरान मलिक सनराइजर्स हैदराबाद संघाकडून खेळत आहे. ही निवड नेट गोलंदाज म्हणून करण्यात आली आहे.
- उमरानने त्याचं पहिलं वैयक्तिक षटक टाकताना पहिला चेंडू **145 किमीच्या वेगाने टाकला. दुसरा चेंडू 142, तर तिसरा चेंडू 150च्या वेगाने टाकला. चौथा चेंडू 147, पाचवा चेंडू 143 आणि सहावा चेंडू 142 च्या** वेगाने टाकला.

## 10 ऑक्टोबर 2021 चालू घडामोडी

कनिष्ठ जागतिक नेमबाजी स्पर्धात भारताचे वर्चस्व :

- अनिश भानवाला, आदर्श सिंग आणि विजयवीर सिद्धू या त्रिकुटाने पुरुषांच्या 25 मीटर रॅपिड फायर पिस्तूल सांघिक प्रकारात सुवर्णपदक जिंकण्याचा पराक्रम दाखवला.

- त्यामुळे कनिष्ठ जागतिक नेमबाजी स्पर्धेत भारताला सर्वाधिक **30 पदकांसह** वर्चस्व प्राप्त करता आले.
- महिलांच्या डबल ट्रॅप प्रकारात भारतानेच तिन्ही पदकांवर नाव कोरले.
- मानवी सोनीने सुवर्ण, येशाया कॉन्ट्रॅक्टरने रौप्य आणि हितासाने कांस्यपदकाची कमाई केली.
- पुरुषांच्या डबल ट्रॅप प्रकारात विनय प्रताप सिंग चंद्रावतने **120 गुणांसह सुवर्णपदक** प्राप्त केले, तर सेहजप्रीत सिंग आणि मयांक शोकीन यांनी अनुक्रमे रौप्य आणि कांस्यपदक मिळवले.
- **50 मीटर** रायफल थ्री पोझिशन्स मिश्र प्रकारात आयुषी पॉडर व ऐश्वर्य प्रताप सिंग तोमर यांनी रौप्यपदक मिळवले.

दिनविशेष:

- **10 ऑक्टोबर** हा दिवस 'जागतिक मानसिक आरोग्य दिन' तसेच 'जागतिक लापशी दिन' आहे.
- **सन 1846** मध्ये इंग्रजी खगोलशास्त्रज्ञ विल्यम लॅसेल यांनी नेपच्यून ग्रहाचा सर्वात मोठा चंद्र ट्रायटन चा शोध लावला.
- भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे संस्थापक व कामगार पुढारी, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील अग्रणी नेते कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे यांचा जन्म **10 ऑक्टोबर 1899** मध्ये झाला.
- श्यामची आई चित्रपटाला **1954** या साली राष्ट्रपतींचे सुवर्णपदक मिळाले.
- **सन 1998** मध्ये 'आदर्श सेन आनंद' भारताचे 29वे सरन्यायाधीश बनले होते.

# October 2021 chalu ghadamodi PDF Download

| Sr.No. | Name | Links | View PDF |
|---|---|---|---|
| 1 | 1 ऑक्टोबर 2021 चालू घडामोडी | Download | Download PDF |
| 2 | 2 ऑक्टोबर 2021 चालू घडामोडी | Download | Download PDF |
| 3 | 3 ऑक्टोबर 2021 चालू घडामोडी | Download | Download PDF |
| 4 | 4 ऑक्टोबर 2021 चालू घडामोडी | Download | Download PDF |
| 5 | 5 ऑक्टोबर 2021 चालू घडामोडी | Download | Download PDF |
| 6 | 6 ऑक्टोबर 2021 चालू घडामोडी | Download | Download PDF |
| 7 | 7 ऑक्टोबर 2021 चालू घडामोडी | Download | Download PDF |
| 8 | 8 ऑक्टोबर 2021 चालू घडामोडी | Download | Download PDF |
| 9 | 9 ऑक्टोबर 2021 चालू घडामोडी | Download | Download PDF |

# आरोग्य विभाग गट क व ड

## 2012 ते 2020 मराठी व्याकरण

## वारंवार आलेले प्रश्न

**LIVE 8 PM** प्रत्येक टॉपिक वर विचारलेले